**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
Chhatrapati Sambhajinagar -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited "A" Grade

स्थापना वर्ष १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Ph.D. Section** विद्यावाचस्पती विभाग

| PH.D. Office :- (0240) 2403122 | WEB SITE : www.bamu.ac.in | : http://bamua.digitaluniversity.ac. | E-mail : phdsection@bamu.ac.in |
|---|---|---|---|

# परिपत्रक

दि. १२/०७/२०२४ रोजी झालेल्या अधिष्ठाता मंडळाच्या इतिवृत्तांस मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या मान्यतेप्रमाणे सर्व संबधितांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, भारताचे राजपत्र ७ नोव्हेबर २०२२ पीएच.डी. अध्यादेशावर विस्तृत चर्चा करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१. अ) ज्या महाविद्यालयामध्ये संबधित विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवला जातो त्या ठीकाणी मान्यता प्राप्त संशोधन केंद्र आहे अशा महाविद्यालयामध्ये शिकविणारा पुर्णवेळ पदव्युत्तर शिक्षक किंवा पदवी वर्गाला शिकवणारा व विद्यापीठाच्या विहीत प्रक्रियेने P.G. Recognized असलेले शिक्षक असतील अशा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवणाऱ्या महाविद्याल्यातील संशोधन मार्गदर्शकाला या नंतरही संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता पुढे चालू ठेवण्यात येईल व संशोधक विद्यार्थी संशोधन मार्गदर्शकाला देण्यात येतील.

ब) तसेच या अगोदर विद्यापीठाने विहीत प्रक्रिया करून जे विशेष संशोधन केंद्र मान्य केलेले आहेत ते संशोधन केंद्र पुर्ववत चालू राहतील उदा. (NIELIT, AJEET SEEDS, WOCKHARDT).

२. एम.फील. हा अभ्यासक्रम पुर्ण करत असतांना ज्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. पुर्ण करण्यासाठी भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या वेगवेगळया संस्थामार्फत पीएच.डी. पूर्ण करण्यासाठी फेलोशिप मिळालेली आहे. अशा एम.फील./ पीएच.डी. (JRF to SRF) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना त्रिसदस्यीय तज्ञ समिती नेमूण समितीने शिफारशीत केलेल्या प्रगती अहवालानुसार पात्र विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी Provisional पत्र निर्गमीत करून प्रवेश देण्याची शिफारस सर्वानुमते करण्यात येत आहे. अशा सर्व एम.फील. ते पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना त्रिसदस्यीय समिती देवून DRC व RRC मध्ये सर्व प्रकरणे मान्य करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

३. एम.फील. / नेट/सेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पेट २०२४ मधून सुट देण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. परंतु सदरील विद्यार्थ्यांना पेट २०२४ मध्ये नोंदणी करणे अनिवार्य राहील. अशा पध्दतीच्या दुरूस्त्या पीएच.डी. अध्यादेशात Ordinance २०२४ मध्ये करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे याची सर्व संशोधक विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक व संशोधन केंद्र यांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसर; ][
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४ ][
संदर्भ. क्र. पीएच.डी./२०२४-२५/3115. ][
दिनांक : १९-०७-२०२४ ][

उपकुलसचिव
पीएच.डी. विभाग